जा.क्र./OW.No. ९४३ / पोउआ/प्रकटीकरण / 2021
पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण),गुन्हे शाखा, मुंबई यांचे कार्यालय.
Office of the
DY.Commissioner of Police (Detection),
Crime Branch, Mumbai.
दूरध्वनी क्र. /Tel. No. 2262 1220
दिनांक/Date : ०४/02/2021

प्रति,

प्रभारी पोलीस निरीक्षक,
पोलीस परिपत्रक कार्यालय,
मुंबई

विषय :- Best Detection of the Month December – 2020 'उत्कृष्ट गुन्हे शोध'
व Best Conviction of the Month December – 2020
उत्कृष्ट अपराधसिद्धी पोलीस नोटीस व वेबसेल मध्ये प्रसिध्द करणेबाबत...

मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे वतीने मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी, अंमलदारांना बेस्ट डिटेक्शन/बेस्ट कनव्हिक्शन/बेस्ट रिकव्हरी ऑफ दि मंथ अर्थात उत्कृष्ट गुन्हे शोध, उत्कृष्ट अपराधसिध्दी व उत्कृष्ट मालमत्ता हस्तगत याकरीता प्रत्येक महिन्याला निवड करण्यात येते.

माहे डिसेंबर २०२० करीता बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ अर्थात उत्कृष्ट गुन्हे शोध व बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ अर्थात उत्कृष्ट अपराधसिध्दी याकरीताचे खालील शाखा/पोलीस ठाणे यांना देण्यात आलेले आहे. तरी सर्व संबधीतांनी नोंद घ्यावी.

**अ) माहे डिसेंबर – २०२० करीताचे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ –**

गुन्हे प्रकटीकरण शाखा, गु.र.क्र. १७०/२० (खार पोलीस ठाणे, गु.र.क्र. ६५२/२०), कलम ११५ सह ३०२, १२०(ब) भादवि. सह कलम ३,२५ भाहका सह कलम ३७(१) (अ), १३५ म.पो.का.

**ब) माहे डिसेंबर – २०२० करीताचे बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ –**

कांदीवली पोलीस ठाणे गु.र.क्र. ३२२/२०१२ कलम ३०२, ३०७, २०१, ३४ भा.द. वि.सह ४, २५ भाहका

सदर उत्कृष्ट गुन्हे शोध ( बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ ) व उत्कृष्ट अपराधसिध्दी (बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ ) बाबतची माहिती सोबत जोडण्यात आली असून सदरची माहिती पोलीस नोटीस व मुंबई पोलीसांचे वेबसेल वर प्रसिध्द करण्यात यावी.

पोलीस उप-आयुक्त (प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, गु.अ.वि., मुंबई.

प्रत:-
वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वेबसेल, पोलीस आयुक्त कार्यालयाचे आवार, मुंबई.

**मजकुर :—**

दिनांक ०२/०२/२०२१ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने " **Best Detection of the Month** " **माहे डिसेंबर २०२०** या याकरीता खाली नमुद पोलीस ठाणेची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ डिसेंबर — २०२०

| | | |
|---|---|---|
| ०१ | गुन्हे शाखा प्रकटीकरण, कक्ष—०९ | गु.प्र.शा., गु.र.क्र. १७०/२० (खार पोलीस ठाणे, गु.र.क्र. ६५२/२०), कलम ११५ सह ३०२, १२०(ब) भादवि. सह कलम ३,२५ भाहका सह कलम ३७(१) (अ), १३५ म.पो.का. |

—: ' कट रचून खुन करण्याचा प्रयत्न ':—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत :—** नमुद गुन्हयात दिनांक १८/१२/२०२० रोजी १६.४५ वा. सुमारास दांडपाडा बस स्टॉप, शुभांगन हॉटेल समोर, खारदांडा रोड, खार पश्चिम, मुंबई येथे पोलीस पथकास एक इसम संशयीतरित्या हालचाल करताना दिसून आल्याने पोलीस पथकाने त्यास घेराव घालुन ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे ०२ गावठी कट्टे, ०२ मोबाईल फोन व ०६ जिवंत काडतुसे व एका महिलेचा रंगीत फोटो मिळुन आला. सदरबाबत त्याच्याकडे केलेल्या चौकशीत त्याने सदरचा फोटो त्यास रामवीर नरेशकुमार शर्मा उर्फ पंडीत, वय ३९ वर्षे, व परदेशस्थित बशिर सुलेमान बेगानी उर्फ बेगानी मामा, यांनी दिला असुन त्याला व त्याचा साथिदारास ०२ महिलांची हत्या करण्यासाठी रु. ६० लाखाची सुपारी देवुन मुंबई मध्ये अग्नीशस्त्रासह पाठविले असल्याचे सांगितले. सदर इसमास अटक करून दोन महिलांचा खुन करण्याचा कट रचुन सदर अपराध करण्यास अग्नीशस्त्रे स्वत:कडे बाळगली म्हणुन सरकार पक्षामार्फत फिर्याद घेवून गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | :— | श्री. राजेंद्र लिलाधर पेडणेकर, वय ४७ वर्षे, धंदा—नोकरी (पो.ना. ३३१५४/गुशा.) |
| **बळीत** | :— | — |
| **आरोपी अटक व दिनांक** | :— | १) मोहम्मद अन्वर शब्बीर दर्जी, वय ३१ वर्षे.<br>२) मोहम्मद जावेद इस्लामुद्दीन अन्सारी, वय ४१ वर्षे,<br>३) विनोद कल्याणजी भगत, वय ६९ वर्षे,<br>४) मकसुद मकबुल कुरेशी, वय ३५ वर्षे,<br>५) रामवीर नरेशकुमार शर्मा उर्फ पंडीत, वय ३९ वर्षे,<br>आरोपी क्र. ०१ दि. १८/१२/२०२० रोजी<br>आरोपी क्र. ०२ ते ०४ दि. २१/१२/२०२० रोजी<br>आरोपी क्र. ०५ दि. २२/१२/२०२० रोजी |

**तपास कौशल्य** :— गुन्हे शाखा प्रकटीकरण, कक्ष—९ येथील प्र.पो.नि. नंदकुमार यांना दोन इसम उत्तर प्रदेश येथुन अग्नीशस्त्रासह मुंबईमध्ये दोन महिलेची हत्या करण्यासाठी नुकतेच आलेले असुन त्यांच्या साथीदाराच्या मदतीने त्यांनी काही दिवसापासुन मुंबईमध्ये रेकी केली आहे. तसेच ते इसम दिनांक १८/१२/२० रोजी शुभांगन हॉटेल समोर, खारदांडा रोड, खार पश्चिम, मुंबई या ठिकाणी साधारण १६.०० ते १८:०० वाजण्याचे सुमारास येणार असल्याचे गुप्त बातमीदाराकडुन खात्रीलायक माहिती मिळाली.

सदर प्राप्त झालेल्या विश्वसनीय माहितीच्या अनुषंगाने प्र.पो.नि. नंदकुमार गोपाळे व पोलीस पथकाने तात्काळ नमुद ठिकाणी सापळा रचला असता सदर ठिकाणी एक इसम दांडपाडा बस

स्टॉपकडुन चालत येवुन शुभांगन हॉटेल समोर येवुन कोणाची तरी वाट पहात थांबला. परंतु गुप्तबातमीदाराने दिलेल्या माहितीवरुन दुसरा इसम आला नाही. करीता दुसऱ्या इसमाची वाट पहात पोलीस पथक तेथे थांबले. बराचवेळ वाट पाहुन दुसरा इसम येत नसल्याने सदर ठिकाणी वाट पाहणारा इसम निघुन जावु लागला असता पोलीस पथकाने त्यास घेराव घालुन ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता, त्याच्याकडे ०२ गावठी कट्टे, ०२ मोबाईल फोन व ०६ जिवंत काडतुसे व एका महिलेचा रंगीत फोटो मिळुन आला. त्याच्याकडे केलेल्या चौकशीत त्याने सदरचा फोटो त्यास रामवीर नरेशकुमार शर्मा उर्फ पंडीत, वय ३९ वर्षे, व परदेशस्थित बशिर सुलेमान बेगानी उर्फ बेगानी मामा, यांनी दिला असल्याचे तसेच त्यांना ०२ महिलांची हत्या करण्यासाठी रु. ६० लाखाची सुपारी देवुन मुंबई मध्ये अग्नीशस्त्रासह पाठविले असल्याचे सांगितले.

आरोपी मोहम्मद अन्वर शब्बीर दर्जी, वय ३१ वर्षे. यास अटक केल्यानंतर गुन्हे शाखेचे पथक बिजनोर, उत्तर प्रदेश व गुजरात येथे तपासकामी गेले व दि.२१/१२/२० रोजी सदर गुन्हयात मोहम्मद जावेद इस्लामुद्दीन अन्सारी, वय ४१ वर्षे, व मकसुद मकबुल कुरेशी, वय ३५ वर्षे, यांना अटक केली. सदर अटक आरोपींकडे केलेल्या चौकशीत व त्यांच्याकडुन जप्त करण्यात आलेल्या मोबाईल फोनच्या तांत्रिक पुराव्यावरुन मॅन्चेस्टर, इंग्लंड येथे रहात असलेला पाहिजे आरोपी बशिर सुलेमान बेगानी उर्फ बेगानी मामा, याने विनोद कल्याणजी भगत, वय ६९ वर्षे, याच्या सांगण्यावरुन नमुद अटक आरोपीतांना त्याच्या नातेवाईक असलेल्या घाटकोपर येथील ०२ सख्ख्या बहिणींची हत्या करण्याची सुपारी दिली असल्याचे निष्पन्न झाल्याने विनोद कल्याणजी भगत, यास वाळकेश्वर, मलबार हिल येथुन दिनांक २१/१२/२०२० रोजी त्याचे रहात्या घरातुन ताब्यात घेवुन सदर गुन्हयात अटक करण्यात आली. सदर गुन्हयातील रामवीर नरेशकुमार शर्मा उर्फ पंडीत, याने विनोद कल्याणजी भगत, व मॅन्चेस्टर, इंग्लंड येथील पाहिजे आरोपी बशिर सुलेमान बेगानी उर्फ बेगानी मामा, यांचेशी कट रचुन बिजनोर, उत्तर प्रदेश येथील ०३ इसमांना अग्नीशस्त्रासह मुंबई येथे नमुद महिलांची हत्या करण्यासाठी पाठविले असल्याचे निष्पन्न झालेले आहे. सदरबाबत गुन्हा नोंद करून आरोपीतांना नमुद गुन्हयात अटक करण्यात आलेली आहे.

अशा प्रकारे मुंबई शहरात ०२ महिलांची हत्या करण्यासाठी आलेल्या उत्तर प्रदेश येथील ०४ आरोपीतांना व मुंबईतील त्यांच्या मुख्य हस्तकाला अटक करुन दोन महिलांची हत्या करण्याच्या गंभीर गुन्हयास मुंबई गुन्हे शाखेने योग्यवेळी उचित कारवाई केल्याने प्रतिबंध केला आहे.

**गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष—०९, तपास पथकातील अधिकारी व अंमलदाराचे नावे**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | प्रभारी पोलीस निरीक्षक | नंदकुमार मारुती गोपाळे | प्रशस्तीपत्रक |
| २ | पोलीस निरीक्षक | आशा विश्वनाथ कोरके | प्रशस्तीपत्रक |
| ३ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | सुधीर आबासाहेब जाधव | प्रशस्तीपत्रक |
| ४ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | शरद चांगदेव धराडे | प्रशस्तीपत्रक |
| ५ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | वाल्मीक निंबा कोरे | प्रशस्तीपत्रक |
| ६ | पोलीस उप—निरीक्षक | विजयेंद्र प्रताप आंबवडे | प्रशस्तीपत्रक |
| ७ | पोलीस उप—निरीक्षक | रामदास तात्याबा कदम | प्रशस्तीपत्रक |
| ८ | पो.ह.क्र. २९६४४ | संतोष कृ णराव काकडे | प्रशस्तीपत्रक |
| ९ | पो.ह.क्र. ३२०८५ | विकास संभाजी सावंत | प्रशस्तीपत्रक |
| १० | पो.ह.क्र. ३२२७२ | गणेश परशुराम पाटील | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पो.ह.क्र. ३२६८० | फकीरा मो.अब्दुल रहमान ेख | प्रशस्तीपत्रक |
| १२ | पो.ह.क्र. ३३१५४ | राजेंद्र लिलाधर पेडणेकर | प्रशस्तीपत्रक |

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | पो.ह.क्र. ३३३५२ | महेश रामचंद्र नाईक | प्रशस्तीपत्रक |
| १४ | पो.ह.क्र. ९६०६९६ | दृष्यंत राजाराम कोळी | प्रशस्तीपत्रक |
| १५ | पो.ह.क्र. ९८०४५४ | शैलेश प्रभाकर देवरुखकर. | प्रशस्तीपत्रक |
| १६ | पो.ना.क्र. ००—४८८ | अमोल शिवाजी हाक्के | प्रशस्तीपत्रक |
| १७ | पो.ना.क्र. ००—८६४ | सचिन शामकुमार राऊत | प्रशस्तीपत्रक |
| १८. | पो.ना.क्र. ०१—१५८ | संतोष साहेबराव लोखंडे | प्रशस्तीपत्रक |
| १९ | पो.ना.क्र. ०३—४२४ | प्रफुल्ल अनंत पाटील | प्रशस्तीपत्रक |
| २० | पो.ना.क्र. ०३—१००८ | अंकुश वामनराव वानखेडे | प्रशस्तीपत्रक |
| २१ | पो.शि.क्र. ०३—१२२३ | प्रविण कृष्णा कांबळे | प्रशस्तीपत्रक |
| २२ | पो.शि.क्र. ०४.११७४ | अमित भिमराव महांगडे | प्रशस्तीपत्रक |
| २३ | पो.शि.क्र. ०४—१२९८ | बाबासाहेब नरहरी शेळके | प्रशस्तीपत्रक |
| २४ | पो.शि.क्र. ०५—३०४ | विकास रामचंद्र पवार | प्रशस्तीपत्रक |
| २५ | म.पो.शि.क्र. ०९—१८४६ | शितल सुशांत लाड | प्रशस्तीपत्रक |
| २६ | म.पो.शि.क्र.११—२७७३ | प्राजक्ता सुहास धुमाळ | प्रशस्तीपत्रक |
| २७ | पो.शि.क्र. १५.११०२ | गितेश अनंत कदम | प्रशस्तीपत्रक |
| २८ | पो.ह.चा.क्र. ३३९०१ | विनायक गोपाळ परब | प्रशस्तीपत्रक |
| २९ | पो.ह.चा.क्र. ०४—१२४० | अविनाश पोपट झोडगे | प्रशस्तीपत्रक |
| ३० | पो.शि.चा.कं.०५—०६३२ | शशिकांत सत्यवान निकम | प्रशस्तीपत्रक |

**मजकुर :—**

दिनांक ०२/०२/२०२१ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने " **BEST CONVICTION OF THE MONTH** " **माहे डिसेंबर —२०२०** या याकरीता खाली नमुद पोलीस ठाणेची निवड करण्यात आलेली आहे.

## ब) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ डिसेंबर — २०२०

| | | |
|---|---|---|
| **०१** | **कांदिवली पालीस ठाणे परिमंडळ—११** | **गु.र.क्र. ३२२/२०१२ कलम ३०२, ३०७, २०१, ३४ भा.द.वि.सह ४, २५ भाहका** |

**—: " पुर्व वैमनस्यातून खुन " :—**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— नमुद गुन्हयात दिनांक २०/११/१२ रोजी रात्रौ २२:१० वाजताचे सुमारास कांदिवली पोलीस ठाणे हद्दीतील एम. जी. क्रॉस रोड नं. २, जलतरण तलाव जंक्शनच्या बाजूला वळणावर, यातील फिर्यादी व मयत इसम कपुरचंद गुप्ता हे मोटार सायकलवरुन घरी जात असता. त्यांचे मागून सिल्व्हर रंगाची मारुती झेन कारमधील इसम १) शिवप्रसाद बाल गोविंद केसरी उर्फ शिवा, वय ३७ व त्याचा साथीदार २) शिवकुमार पथरु भारद्वाज, वय ४२ यांनी पुर्व वैमनस्याचा राग मनात धरून फिर्यादीच्या मोटार सायकलला मागून ठोकर दिली व खाली पाडून बळीत कपूरचंद गुप्ता यांना त्यांच्या हातातील चॉपर सारख्या हत्याराने सपासप वार करुन जीवे ठार मारले. तसेच फिर्यादीवर चॉपरचा वार करुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला म्हणून गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री. योगेश अखिलेश गौड, वय २३ वर्षे, |
| बळीत/मयत | :— | श्री. कपूरचंद दुर्गाप्रसाद गुप्ता, वय ४७ वर्षे, |
| आरोपी अटक व दिनांक | :— | १) शिवप्रसाद बाल गोविंद केसरी उर्फ शिवा, वय ३७ वर्षे<br>२) शिवकुमार पथरु भारद्वाज उर्फ शिवा, वय ४२ वर्षे<br>अटक दिनांक २१/११/१२ रोजी |
| निकाल दिनांक | :— | **०७/१२/२०२० रोजी** |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | सदर गुन्हयात मा. जज श्री. एस.यु. बघेले, अति. सत्र न्यायाधिश, कोर्ट क्र. १०, दिंडोशी सत्र न्यायालय, मुंबई यांनी १) शिवप्रसाद बाल गोविंद केसरी उर्फ शिवा, हि/३७ व त्याचा साथीदार २) शिवकुमार पथरु भारद्वाज उर्फ शिवा, हि/४२ यांना कलम ३०२, ३४ भादवि अन्वये जन्मठेप नैसर्गिक जीवन संपेपर्यंत व प्रत्येकी अनुक्रमे रुपये १०,००,०००/— व रुपये १,००,०००/— दंड व दंड न भरल्यास ०३ वर्षोची कठोर कारवासाची शिक्षा,<br>तसेच कलम २०१ भादवि अन्वये ०२ वर्षोची कठोर कारवासाची शिक्षा व प्रत्येकी रुपये २०००/— दंड व दंड न भरल्यास ०२ महिने कठोर कारावासाची शिक्षा<br>कलम ४, २५ भाहका अन्वये ०२ वर्षोची कठोर कारावासाची शिक्षा व प्रत्येकी रुपये २०००/— दंड व दंड न भरल्यास ०२ महिने कठोर कारावासाची शिक्षा सुनावली आहे. |

**तपास कौशल्य** :— सदर गुन्हयाचा परिपुर्ण तपास करुन आरोपीविरुध्द सबळ पुरावा गोळा करुन मा. अति. सत्र न्यायाधिश, कोर्ट क्र. १०, शहर सत्र न्यायालय, दिंडोशी, मुंबई यांचे न्यायालयात सेशन केस क्र. ८६/२०१३ अन्वये दोषारोपपत्र दाखल केले. सदर गुन्हयातील तत्कालीन तपासी अधिकारी १) श्री. भारत मारकड, पोलीस निरीक्षक (सध्या सेवानिवृत्त), २) श्री. रविंद्र परेमेश्वर अडाणे, पोलीस निरीक्षक, ३) मिलींद विठ्ठल जाधव/पो.ह.क्र. २९८०१, कोर्ट कारकून, ४) श्री. जयंत कृष्णा शेळके/पो.ना.क्र. ९६१३२८, कोर्ट कारकुन व ५) श्री. प्रविण श्रीपती सावंत/पो.ना.क्र. ०३—३६४,

पोनि (गुन्हे) मदतनीस यांनी यातील फिर्यादी, साक्षीदार, पंच यांना वेळोवेळी मार्गदर्शन करुन मा. न्यायालयात साक्षीकरीता वेळेवर हजर ठेवले.

त्याचप्रमाणे वरील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयातील आरोपीताविरुध्दचे पुरावे सक्षमपणे मा. न्यायालयासमोर मांडले त्यामुळे सदर गुन्हयात मा. जज श्री. एस.यु. बघेले, अति. सत्र न्यायाधिश, कोर्ट क्र. १०, दिंडोशी सत्र न्यायालय, मुंबई यांनी अटक आरोपी १) शिवप्रसाद बाल गोविंद केसरी उर्फ शिवा, हि/३७ व त्याचा साथीदार २) शिवकुमार पथरु भारद्वाज उर्फ शिवा, हि/४२ यांना कलम ३०२, ३४ भादवि अन्वये जन्मठेप नैसर्गिक जीवन संपेपर्यंत व प्रत्येकी अनुक्रमे रुपये १०,००,०००/— व रुपये १,००,०००/— दंड व दंड न भरल्यास ०३ वर्षोची कठोर कारवासाची शिक्षा, तसेच कलम २०१ भादवि अन्वये ०२ वर्षोची कठोर कारवासाची शिक्षा व प्रत्येकी रुपये २०००/— दंड व दंड न भरल्यास ०२ महिने कठोर कारावासाची शिक्षा व कलम ४, २५ भाहका अन्वये ०२ वर्षोची कठोर कारावासाची शिक्षा व प्रत्येकी रुपये २०००/— दंड व दंड न भरल्यास ०२ महिने कठोर कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

**कांदीवली पोलीस ठाणे तपास पथकातील अधिकारी व अंमलदाराचे नावे खालीलप्रमाणे.**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक | भरत मरकड (सध्या सेवानिवृत ) | प्रशस्तीपत्रक |
| २ | पोलीस निरीक्षक | रविंद्र परेमेश्वर अडाणे, | प्रशस्तीपत्रक |
| ३ | पो.ह.क्र. २९८०१ | मिलिंद विठ्ठल जाधव | प्रशस्तीपत्रक |
| ४ | पो.ना.क्र. ९६१३२८ | जयंत कृष्णा शेळके | प्रशस्तीपत्रक |
| ५ | पो.ना.क्र. ०३३६४ | प्रविण श्रीपती सावंत | प्रशस्तीपत्रक |